INDIA'S LARGEST CONTAINER PORT

जनेप प्राधिकरण JNPA

# JNPA Strengthens Trade Support Through Coordinated Stakeholder Efforts Amid Middle East Disruptions

***Stranded Containers Drop from 5,000 to 3,200***

Mumbai | March 9, 2026, |
Ministry of Ports, Shipping and Waterways (MoPSW) has issued the SOP for all the Major Ports to mitigate the impact of geopolitical disturbance in the Middle East. Accordingly JNPort has constituted a task force comprising of following members:

- Joint DGFT
- Addl Commissioner Customs
- CGM (Traffic) JNPA
- Dy. Nautical Advisor

Shri Girish Thomas, CGM (Traffic), JNPA (Mob:9526062433, Email-cmt@jnport.gov.in), has been appointed as the Single Point of Contact for all coordination and communications related to trade disruptions arising from the evolving geopolitical situation in the Middle East.

The disruption has impacted on vessel schedules and export cargo movement to Middle East, prompting coordinated efforts between port authorities and trade stakeholders. Shri Gaurav Dayal, IAS, Chairman, JNPA and Shri Ravish Kumar Singh, IRTS, Deputy Chairman, JNPA are holding regular consultations with shipping lines, exporters, terminal operators, Customs and maritime authorities, BCBA, APEDA, CSLA, MANSA, FFFAI, and Transporters Association to closely monitor the situation and address operational concerns.

To support the EXIM community and ease congestion at the port, JNPA has implemented several facilitation measures.

Key initiatives undertaken include:

- Temporary transshipment storage for Middle East-bound cargo
- Allocation of additional storage areas at terminals where required
- Facilitation of ad-hoc vessel calls for moving Middle East cargo to Middle East ports which are on eastern side of the strait Hormuz mainly

Fujairah and Khor Fakkan in the UAE and Sohar, Muscat, and Salalah in Oman.

- Priority handling for perishable cargo and export cargo returning from the Middle East
- Expedited 'Back to Town' (BTT) movement of export containers

An important facilitation measure has been taken by Customs authorities at JNCH enabling BTT movement of export cargo even in cases where the Export General Manifest (EGM) has not been filed. Where container seals are intact, permission will be granted after basic verification. Containers at CPP require only e-seal verification, while those at Container Freight Stations undergo limited inspection linked to the shipping bill. The usual detailed physical examination has been waived, and any BTT-related fees or penalties have also been waived.

Following consultations with the Reefer Transporters Association, it has also been confirmed that adequate trailers are available for the movement of reefer as well as other containers requiring BTT evacuation, ensuring smooth evacuation of containers from the port without logistical constraints, especially for banana, grapes and other perishable cargo which have lesser shelf life.

Speaking on the situation, Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA, said: "JNPA is closely monitoring the evolving situation and remains fully committed to supporting the EXIM community. We are in constant consultation with the Ministry, Customs authorities, terminal operators and trade stakeholders to explore relief measures that can ease cargo movement and minimize disruption. Our endeavor is to identify practical solutions that support exporters and ensure seamless port operations.

As a result of these coordinated efforts, the situation at the port has shown steady improvement. The number of stranded containers at JNPA has reduced from around 5,000 TEUs on 1 March to nearly 3,200 TEUs on 8 March, while stranded perishable containers have reduced from around 2,000 to about 1,000. Efforts are ongoing to further reduce the number of stranded containers at the earliest possible time.

JNPA remains in close coordination with the Ministry, terminal operators, shipping lines and the trade community to ensure smooth cargo movement and sustained support to the EXIM sector, while actively exploring additional facilitation measures to further ease trade operations.

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA)**

Jawaharlal Nehru Port Authority (JNPA), commissioned in 1989, is India's largest container port and a key gateway for the country's international trade. The port operates five container terminals and handles a significant share of India's containerised EXIM cargo. JNPA also manages a multi-product Special Economic Zone (SEZ) aimed at boosting export-led industrial growth. In addition, JNPA is developing the Vadhvan Port in Maharashtra, envisioned to be among the largest deep-draft ports in the world and India's first green port of its scale.

For media enquiries, please contact:
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +91 9920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

**Visit our website and social media to learn more:**

JN Port: www.jnport.gov.in
LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority
X: @JNPort
Instagram: @jnpaport
Facebook: @JNPA
— Ends —

# मध्यपूर्वेतील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जेएनपीएकडून भागधारकांच्या समन्वित प्रयत्नांद्वारे व्यापार समर्थनास बळकटी

*अडकलेल्या कंटेनर्सच्या संख्येत 5,००० वरून 3,2०० पर्यंत घट*

**मुंबई | 9 मार्च, 2026 |**

बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने मध्यपूर्वेतील राजकीय अस्थिरतेचा प्रभाव कमी करण्यासाठी सर्व प्रमुख बंदरांसाठी मानक कार्यप्रणाली जाहीर केली आहे. त्यानुसार, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्रशासनाने खालील सदस्यांचा समावेश असलेले एक विशेष कृती दल स्थापन केले आहे:

- संयुक्त महासंचालक, परकीय व्यापार
- अप्पर सीमाशुल्क आयुक्त
- मुख्य महाव्यवस्थापक (वाहतूक), जेएनपीए
- उप नॉटिकल सल्लागार

मध्यपूर्वेतील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे व्यापारात निर्माण होणाऱ्या व्यत्ययांसंबंधी सर्व समन्वय आणि संवादासाठी श्री. गिरीश थॉमस, मुख्य महाव्यवस्थापक (वाहतूक), जेएनपीए, (संपर्क: 9526062433, ईमेल: cmt@jnport.gov.in) यांची प्रमुख संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मध्यपूर्वेतील संकटामुळे जहाजांचे वेळापत्रक आणि निर्यात मालाच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे, ज्यामुळे पोर्ट प्राधिकरण आणि व्यापारी भागधारकांमध्ये समन्वित प्रयत्नांची गरज निर्माण झाली आहे. श्री गौरव दयाल, भा. प्र. से., अध्यक्ष, जेएनपीए आणि श्री रवीश कुमार सिंह, भा. रे. वा. से., उपाध्यक्ष, जेएनपीए हे शिपिंग लाईन्स, निर्यातदार, टर्मिनल ऑपरेटर्स, सीमाशुल्क आणि सागरी अधिकारी, तसेच बीसीबीए, एपीईडीए, सीएसएलए, एमएएनएसए, एफएफएफएआय आणि ट्रान्सपोर्टर्स असोसिएशन यांच्याशी नियमित चर्चा करत आहेत. परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवणे आणि कार्यान्वित अडचणींचे निराकरण करणे हा या चर्चेचा मुख्य उद्देश आहे.

आयात निर्यात समुदायाला पाठबळ देण्यासाठी आणि बंदरावरील गर्दी कमी करण्यासाठी, जेएनपीए ने अनेक सुविधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. याअंतर्गत हाती घेतलेले मुख्य उपक्रम खालीलप्रमाणे आहेत:

- मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या मालासाठी तात्पुरत्या 'ट्रान्सशिपमेंट' साठवणुकीची सोय.
- गरजेनुसार टर्मिनल्सवर अतिरिक्त साठवणूक क्षेत्राचे वाटप.

- होरमुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्व बाजूला असलेल्या मध्यपूर्वेतील बंदरांसाठी (मुख्यतः संयुक्त अरब अमिरातीमधील फुजैराह व खोर फक्कन आणि ओमानमधील सोहार, मस्कत व सलालाह) मालाची ने-आण करण्यासाठी विशेष तात्कालिक जहाजांच्या फेऱ्यांची सुविधा.
- नाशवंत माल आणि मध्यपूर्वेतून परत येणाऱ्या निर्यात मालाला प्राधान्याने हाताळणी.
- निर्यात कंटेनर्सच्या 'बॅक टू टाऊन' (बीटीटी) हालचालींना वेग देणे.

जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊस येथील सीमाशुल्क विभागाने निर्यात मालाच्या वाहतुकीस सुलभता देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाययोजना लागू केली आहे. या उपाययोजनेनुसार, एक्सपोर्ट जनरल मॅनिफेस्ट (ईजीएम) दाखल झालेले नसतानाही निर्यात मालाच्या कंटेनर्सना बीटीटी द्वारे हालचालीस परवानगी देण्यात येणार आहे. कंटेनरवरील सील अबाधित असल्यास प्राथमिक पडताळणीनंतर ही परवानगी दिली जाईल. सीपीपी येथे असलेल्या कंटेनर्ससाठी केवळ ई-सील पडताळणी आवश्यक राहील, तर कंटेनर फ्रेइट स्टेशन (सीएफएस) मधील कंटेनर्ससाठी संबंधित शिपिंग बिलशी जोडलेली मर्यादित तपासणी केली जाईल. यासाठीची नेहमीची सविस्तर भौतिक तपासणी सध्या माफ करण्यात आली आहे. तसेच, बीटीटी संदर्भातील कोणतेही शुल्क किंवा दंडही माफ करण्यात आले आहेत. ही उपाययोजना निर्यात प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि व्यापार सुलभतेसाठी करण्यात आली आहे.

रीफर ट्रान्सपोर्टर्स असोसिएशनसोबत झालेल्या चर्चेनंतर, रीफर तसेच बीटीटी अंतर्गत हलविण्यात येणाऱ्या इतर कंटेनर्सच्या वाहतुकीसाठी पुरेशा ट्रेलर्सची उपलब्धता असल्याचेही निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे बंदरातून कंटेनर्सची निर्गमन प्रक्रिया कोणत्याही लॉजिस्टिक अडचणींशिवाय सुरळीतपणे पार पडत आहे. विशेषतः केळी, द्राक्षे तसेच इतर लवकर नाश पावणाऱ्या कृषी मालाच्या बाबतीत, व नाशवंत मालाच्या कंटेनर्सची वेळेत आणि सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यासाठी ही व्यवस्था महत्त्वपूर्ण ठरत आहे.

या परिस्थितीबद्दल बोलताना, जेएनपीएचे अध्यक्ष, भा. प्र. से. , श्री गौरव दयाल म्हणाले, "जेएनपीए बदलत्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि आयात-निर्यात व्यवसायातील समुदायाला पाठिंबा देण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. माल वाहतूक सुलभ करण्यासाठी आणि व्यत्यय कमी करण्यासाठी मदत उपायांचा शोध घेण्यासाठी आम्ही शिपिंग मंत्रालय, सीमाशुल्क अधिकारी, टर्मिनल ऑपरेटर आणि व्यापार भागधारकांशी सतत चर्चा करत आहोत. निर्यातदारांना आधार देणारे व्यावहारिक उपाय ओळखणे आणि बंदरांचे सुरळीत कामकाज सुनिश्चित करणे हा आमचा प्रयत्न आहे."

या समन्वित प्रयत्नांमुळे, बंदरातील परिस्थितीत सातत्याने सुधारणा दिसून येत आहे. जेएनपीएमध्ये अडकलेल्या कंटेनरची संख्या 1 मार्च रोजी सुमारे 5,000 टीईयू होती ती 8 मार्च रोजी सुमारे 3,200 टीईयू झाली आहे, तर अडकलेल्या नाशवंत कंटेनरची संख्या सुमारे २००० वरून सुमारे १००० पर्यंत कमी झाली आहे. अडकलेल्या कंटेनरची संख्या लवकरात लवकर आणखी कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

जेएनपीए शिपिंग मंत्रालय, टर्मिनल ऑपरेटर, शिपिंग लाईन्स आणि व्यापारी समुदायाशी सातत्याने समन्वय साधत आहे जेणेकरून कार्गो वाहतूक सुरळीत होईल आणि आयात निर्यात क्षेत्राला सतत पाठिंबा मिळेल, तसेच व्यापार संचलन अधिक सुलभ करण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपायांचा सक्रियपणे शोध घेतला जात आहे.

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) ची स्थापना 1989 मध्ये झाली असून ते भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर आणि देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार आहे. या बंदरावर पाच कंटेनर टर्मिनल्स कार्यरत असून भारतातील कंटेनरयुक्त निर्यात-आयात मालवाहतुकीपैकी मोठा वाटा येथे हाताळला जातो. जेएनपीएकडून निर्याताभिमुख औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी बहुउत्पाद विशेष आर्थिक क्षेत्र देखील विकसित करण्यात आले आहे. याशिवाय, महाराष्ट्रात वाढवण बंदर विकसित करण्याचे काम जेएनपीए कडून सुरू असून, ते जगातील सर्वात मोठ्या खोल पाण्याच्या बंदरांपैकी एक तसेच या प्रमाणावर उभारले जाणारे भारतातील पहिले हरित बंदर ठरणार आहे.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**
जनेप प्राधिकरण:
अंबिका सिंग
सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण
मोबाईल क्रमांक: +919920372677
ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in

लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort

इंस्टाग्राम: @jnpaport

फेसबुक: @JNPA